खटला दाखल तारीख : २६/०७/२०१९
खटला फैलावर तारीख: २६/०७/२०१९
खटला निकाल तारीख : २०/०५/२०२६
कालावधी : व. म. दि.
०६ ०९ २४
निशाणी क्रमांक : **९१/ब**

**भाग अ**

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी आर्णी, जि. यवतमाळ यांच्या न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी : विशाल श्रावण धोंडगे)

नियमित फौजदारी खटला
क्र. ८८/२०१९

**सरकारतर्फे सहा. पोलिस निरीक्षक**
आर्णी पोलिस ठाणे
ता. आर्णी, जि. यवतमाळ. ... अभियोग पक्ष.

**विरुध्द**

**१. स्वप्नील प्रकाश गावंडे**, वय– ३५ वर्षे,
**२. अश्वीनी शरद गावंडे**, वय– ३५ वर्षे,
**३. शरद प्रकाश गावंडे**, वय– ३८ वर्षे,
**४. पुष्पा प्रकाश गावंडे**, वय– ६१ वर्षे,
रा. महाळुंगी, ता. आर्णी, जि. यवतमाळ. ........... आरोपी

**दोषारोप :** भा. दं. वि. कलम ४३५,३२४,५०४,
५०६ सह ३४ अन्वये प्रमाणे.

हजेरी–
अभियोग पक्षातर्फे शासकीय अभियोक्ता : श्री. आर.पि.गावंडे
आरोपीतर्फे विधिज्ञ : श्री. एस.के.राठोड

# न्यायनिर्णय

(दिनांक २० मे, २०२६ रोजी घोषीत)

**भाग ब**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ०९/०४/२०१९ |
| फिर्याद दाखल केल्याची तारीख | ०९/०४/२०१९ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याची तारीख | २६/०७/२०१९ |
| दोषारोप निश्चीत केल्याची तारीख | २८/०८/२०१९ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | १३/०२/२०२० |
| न्यायनिर्णय करीता प्रकरण ठेवल्याची तारीख | २०/०५/२०२६ |
| न्यायनिर्णय जाहीर केल्याची तारीख | २०/०५/२०२६ |
| दोषी व्यक्तीस जेलमध्ये पाठविल्याची तारीख, लागु असल्यास | – |

आरोपीची माहिती

| क्र. | नाव | अटकेची तारीख | जामिनावर सोडल्याची तारीख | गुन्ह्याची कलमे | आरोपीस निर्दोष मुक्त केले की सिध्ददोष | दिलेली शिक्षा | संपरिक्षे दरम्यान जेलमध्ये पाठविल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **स्वप्नील प्रकाश गावंडे** | २२/०४/२०१९ | २२/०४/२०१९ | भा.दं.वि. कलम ४३५,३२४, ५०४, ५०६ सह ३४ | निर्दोष मुक्त | – | – |
| २ | **अश्वीनी शरद गावंडे** | | | | | | |
| ३ | **शरद प्रकाश गावंडे** | | | | | | |
| ४ | **पुष्पा प्रकाश गावंडे** | | | | | | |

प्रस्तुत खटल्यामध्ये आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम ४३५,

३२४,५०४,५०६ सह ३४ अन्वये शिक्षापात्र अपराधाकरिता संपरिक्षा घेण्यात आली.

२. अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणेः–

दि. ०९/०४/२०१९ रोजी सकाळी ९.०० वाजताचे सुमारास मौजा महाळुंगी येथील शेत शिवारात आरोपींनी संगनमत करून फिर्यादी व साक्षीदार यांना काठीने मारहाण करून त्यांना इच्छापुर्वक दुखापत पोचविली, शेतातील उस पिकाचे जाळून नूकसान केले, तसेच शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली, वगैरे मजकूराच्या फिर्यादीवरुन आरोपीविरुध्द गु.र.नं.२१८/२०१९ भारतीय दंड संहिता कलम ४३५,३२४,५०४,५०६ सह ३४ अन्वये नोंदविण्यात आला. तपास अधिकारी यांनी घटनेचा पुढील तपास केला. त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले, घटनास्थळाचा पंचनामा व जप्ती पंचनामा केला. तपासाअंती आरोपींविरूध्द पुरेसा पुरावा गोळा झाल्याने दोषारोपपत्र दाखल केले.

३. आरोपीविरूध्द भारतीय दंड संहिता कलम ४३५,३२४,५०४,५०६ सह ३४ अन्वये शिक्षेस पात्र असणारा दोषारोप (नि.क्र.२३) निश्चित करण्यात आला. आरोपींनी गुन्हा कबूल नसल्याचे सांगून खटल्याला सामोरे जाण्याची तयारी दर्शवली. आरोपींविरूध्द अभिलेखावर पुरावा आल्याने त्यांचे कलम ३१३ फौजदारी प्रक्रिया संहिता अंतर्गत निवेदन निशाणी क्र.८९ ते ९२ कडे नोंदविण्यात आले. त्यात त्यांनी संपूर्ण बचावाचा पवित्रा घेतला.

४. सहाय्यक शासकीय अभियोक्ता व आरोपीतर्फे विधिज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला व पुराव्याअंती न्यायनिर्णयाकरिता खालील वादप्रश्न उपस्थित झाले व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे देण्यात येतात.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोगपक्षाने हे सिध्द केले का की, दि. ०९/०४/२०१९ रोजी सकाळी ९.०० वाजताचे सुमारास मौजा महाळुंगी येथील शेत शिवारात आरोपींनी फिर्यादीच्या वडीलांच्या शेतातील उस पिकाला आग लावून नूकसान केले व त्याद्वारे भारतीय दंड विधान ४३५ सह ३४ प्रमाणे शिक्षेसपात्र अपराध केला ? | ... नाही. |
| २ | अभियोगपक्षाने हे सिध्द केले का की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करून फिर्यादी व साक्षीदार यांना काठीने तसेच गोट्याने मारहाण करून त्यांना इच्छापुर्वक दुखापत पोचविली व त्याद्वारे भारतीय दंड विधान ३२४ सह ३४ प्रमाणे शिक्षेसपात्र अपराध केला ? | ... नाही. |

| | | |
|---|---|---|
| ३ | अभियोगपक्षाने हे सिध्द केले का की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी फिर्यादीला शिवीगाळ केली, त्यामुळे त्यांना राग येऊन त्यांनी इतर लोकांचा स्वस्थपणा मोडावा किंवा दुसरा एखादा अपराध करावा यासाठी त्यांना प्रवृत्त केले व त्यायोगे भा. दं. वि. कलम ५०४ सह ३४ अन्वये शिक्षापात्र अपराध केला ? | ... नाही. |
| ४ | अभियोगपक्षाने हे सिध्द केले का की, उपरोक्त तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी फिर्यादीला उद्देशपूर्वक फौजदारीपात्र धाकदपटशा करुन मनात भिती निर्माण होईल अशाप्रकारे जीवाने मारण्याची धमकी दिली व त्यायोगे भारतीय दंड विधान कलम ५०६ सह ३४ अन्वये शिक्षापात्र अपराध केला? | ... नाही. |
| ५ | आदेश काय ? | ...अंतिम आदेशाप्रमाणे |

**५.** आरोपींविरूध्दचा दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने ७ साक्षीदार तपासले, तसेच काही कागदोपत्री पुरावे दाखल केले. त्यांचा संदर्भ यापुढे वेळोवेळी घेण्यात येत आहे. उभय पक्षांचा युक्तिवाद ऐकला.

**भाग क**

साक्षीदारांची यादी.

| अभियोगपक्षाचे साक्षीदार | | |
|---|---|---|
| क्र. | नाव | साक्षीदाराचा प्रकार |
| **अ.सा.क्र.१** | नम्रता भास्कर जवके | फिर्यादी |
| **अ.सा.क्र.२** | पुष्पा सुभाष गावंडे | साक्षीदार |
| **अ.सा.क्र.३** | सुभाष तुकाराम गावंडे | साक्षीदार |
| **अ.सा.क्र.४** | सोनू प्रविण जाधव | साक्षीदार |
| **अ.सा.क्र.५** | कृष्णा अशोकराव लाखकर | पंच |
| **अ.सा.क्र.६** | अतूल साहेबराव गावंडे | पंच |
| **अ.सा.क्र.७** | सुरेश विठ्ठलराव शिंदे | तपास अधिकारी |

| बचाव पक्षाचे साक्षीदार |
|---|
| - |
| न्यायालयाचे साक्षीदार |
| - |

निशाणी क्रमांक दिलेले कागदपत्रांची यादी.

| अभियोगपक्षाची कागदपत्रे | | |
|---|---|---|
| क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे वर्णन |
| १. | निशाणी ३३/अ.सा.क्र.१ | फिर्याद |
| २. | निशाणी ३४/अ.सा.क्र. १ | छापील प्रथम खबरी अहवाल |
| ३. | निशाणी ८५/अ.सा.क्र. ७ | घटनास्थळ पंचनामा |
| ४. | निशाणी ३४/अ.सा.क्र. ७ | जप्ती पंचनामा |
| ५. | निशाणी ३४/अ.सा.क्र. ७ | जप्ती पंचनामा |
| बचाव पक्षाची कागदपत्रे | | |
| - | | |
| न्यायालयाची कागदपत्रे | | |
| - | | |
| आर्टीकल | | |
| – | – | – |

## का र ण मि मां सा

**वादप्रश्न क्रमांक १ ते ४ करीता:–**

६. अभियोग पक्षातर्फे फिर्यादी म्हणून नम्रता भास्कर जवके (अ.सा.क्र.१) यांना नि.क्र.३२ कडे तपासण्यात आले. त्यांनी शपथेवर कथन केले की, "घटना दि.९/४/२०१९ रोजी महाळुंगी येथे शेत सर्व्हे नं. २८/२ मध्ये सकाळी ९.३० वाजताचे सुमारास घडली होती. घटनेचे वेळेस मी, माझी आई पुष्पा सुभाष गावंडे, वडील सुभाष तुकाराम गावंडे व माझी बहिण सोनु प्रविण जाधव हे शेतात जात असताना आमचे शेतातील उस जाळलेला दिसला.सदरचे जाळलेल्या उसाचा फोटो काढण्याकरीता मी माझा फोन काढला. तेव्हा आरोपी स्वप्नील प्रकाश गावंडे हा एमएच२९ एबी २८५७ मोटरसायकल वर घटनास्थळावर अश्विनी शरद गावंडे हिचेसोबत आला. तसेच शरद प्रकाश गावंडे व त्याची आई पुष्पा

प्रकाश गावंडे हे दुस–या दुचाकीवर आले व आम्हाला अश्लिल शिवीगाळ करून लागले.त्यानंतर पुष्पा प्रकाश गावंडे यांनी अश्विनी शरद गावंडे हिचे हातात दगड दिला व मला जिवाने मारण्यास सांगीतले. त्यावरून अश्विनने मला दगडाने डाव्या डोळयाचे वर डोक्यावर मारले. त्यामुळे मला जखम झाली.त्यानंतर आरोपी स्वप्नील गावंडे याने मला काठीने उजव्या खांदयावर का पाठीवर मारले. त्यानंतर आरोपींनी काठीने मला, माझे आई वडील व बहिणीला मारले. त्यात माझे आईला शरद, अश्विनी, स्वप्नील व पुष्पा यांनी काठीने पाठीवर मारले, बहिणीला सर्व आरोपींनी छातीवर व कमरेला काठीने मारले, माझे वडीलाचे तोंडावर शरदने बुक्कीने मारले. त्यामुळे त्यांचे दात हालत आहेत.त्यानंतर आरोपींनी आम्हाला उस जाळलयासारखा तुम्हाला पण जाळुन टाकु अशी जिवाने मारण्याची धमकी दिली.त्यानंतर आरोपींविरूध्द पोलीस स्टेशन आर्णी येथे तक्रार देण्याकरीता गेलो असता पोलीसांनी मला पुर्वी मेडिकल करून घे असे सांगीतले व त्यानंतर मी निशाणी ३३ कडील तक्रार व निशाणी ३४ कडील छापील एफ.आय.आर. दिली.”

७. त्यांनी त्यांच्या उलटतपासात कथन केले की, "शेतीबद्दल आमचे व आरोपींचे मागील १४ वर्षापासून वाद आहेत. तकार दिल्यानंतर आमचे शेतजमीन शेत सर्व्हे नं. २८/२ मध्ये आम्ही उस लावला होता व त्यावर आमचा ताबा आहे याबददलचा कागदोपत्री पुरावा मी पोलीसांना तपासादरम्यान दिला नव्हता. आरोपी ज्या गाडीवर आले होते त्या गाडीचा नंबर मी पोलीसांना बयान देतेवेळेस सांगीतला नव्हता. आरोपींनी माझी आई हिला काठीने मारले होते, माझे वडीलाला तोंडावर बुक्कयाने मारले याबददल मी पोलीसांना बयान देतेवेळेस सांगीतले होते परंतु सदरची बाब माझे बयानात का नमुद नाही याबददल मी आज रोजी सांगु शकत नाही.”

८. अभियोग पक्षातर्फे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार म्हणून पुष्पा सुभाष गावंडे (अ.सा.क्र.२) यांना नि.क्र.३५ कडे तपासण्यात आले. त्यांनी शपथेवर कथन केले की, "घटना मागच्या वर्षी महाळुंगी येथे शेत सर्व्हे नं.२८/२ चे पांदन रस्त्यावर सकाळी ९.०० ते ९.३० वाजताचे सुमारास घडली होती. घटनेचे वेळेस मी व माझया दोन मुली शेतात मुंगाच्या शेंगा तोडण्याकरीता जात होतो.तेव्हा आम्हाला आमचे शेतातील उस पेटलेला दिसला. तेव्हा तो आम्ही पाहात असताना माझी मुलगी नम्रता जवके ही समोर होती व तिचे मागे सोनु व तिचे मागे मी होतो. त्यावेळेस आरोपी दोन मोटरसायकलवर बसुन घटनास्थळावर आले.त्यावेळेस माझी मुलगी नम्रता ही फोटो काढण्याकरीता मोबाईल काढला असता आरोपी अश्विनने तिचे डोक्यावर दगड मारला. त्यानंतर आरोपी अश्विन, शरद यांनी काठीने नम्रता हिला मारले. त्यामुळे ती बेशुध्द पडली.त्यानंतर पुष्पा गावंडे हिने अश्विनच्या हातात दगड देवुन नम्रता हिला मारून टाक असे सांगीतले. त्यानंतर आरोपींनी सोनुला सुध्दा लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यानंतर आरोपींनी मला सुध्दा लाथाबुक्क्यांनी माझे पाठीवर व हातावर मारहाण केली.त्यानंतर सदरची घटना पाहुन सुभाष गावंडे घटनास्थळावर आले असता अश्विन गावंडे याने त्यांना मारहाण करून त्यांचे दात

पाडले. त्यनंतर आम्ही आरोपींविरूध्द पोलीस स्टेशन आर्णी येथे तकार दिली.”

९. त्यांनी त्यांच्या उलटतपासात कथन केले की, "दि.३/६/२०१५ रोजी सुधाकर तुकाराम गावंडे, स्वप्नील प्रकाश गावंडे, नंदकुमार प्रकाश गावंडे व शरद प्रकाश गावंडे यांचे विरोधात माझे मुलीचा विनयभंग केल्याबददल तक्रार दाखल केली होती. दि.३/६/२०१५ रोजी सुधाकर गावंडे यांनी आमचे विरोधात शेतीत अडथळा निर्माण करीत आहे व शिवीगाळ करून मारहाण करीत आहे याबददलची तकार दिली होती. आम्ही विनयभंगाच्या तकारीमध्ये आरोपींसोबत आपसी केले होते. प्रकाश तुकाराम गावंडे यांनी आमचे विरोधात उस कापण्याकरीता अडथळा निर्माण करीत आहे याबददलचा दिवाणी दावा न्यायालयात दाखल केला होता. सदरचे दाव्यामध्ये वि.न्यायालयाने प्रकाश गावंडे यांचा मनाई हुकुमाचा अर्ज खारीज केला होता त्यामुळे आम्हाला वाटले की, न्यायालयाने आमचे बाजुने निर्णय दिला त्यामुळे आम्ही शेत सर्व्हे नं. २८/२ मध्ये रोज जावुन बसायचो. आम्ही अडथळा निर्माण करीत होतो म्हणुन शरद गावंडे यांनी दि.११/३/२०१९ रोजी आमचे विरोधात पोलीस स्टेशन आर्णी येथे तकार दिली होती. शेत गट क.२८/२ मधील उस कापुन आम्ही आर्णी येथे विकत होतो. शरद गावंडे यांनी आमचे विरोधात शेत गट नं. २८/२ मधील उस बेकायदेशीरपणे कापत आहे म्हणुन तकार दिली होती. ”

१०. अभियोग पक्षातर्फे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार म्हणून सुभाष तुकाराम गावंडे (अ.सा.क्र.३) यांना नि.क्र.४९ कडे तपासण्यात आले. त्यांनी शपथेवर कथन केले की, "घटना दि.९/४/२०२० रोजी सकाळी ९.१५ वाजता शेतात घडली होती. मी शेतामध्ये ढोरं चारत होतो. त्यावेळी मला आरोपींचे भांडणाचा आवाज ऐकु आला.त्यावेळी आरोपी फिर्यादीला मारहाण करीत होते. आरोपी क्र.२ अश्वीनी हिने फिर्यादीला डोक्याच्या डाव्या बाजुला दगडाने मारले. त्यामुळे ती रक्तबंबाळ झाली. सर्व आरोपी तिला मारुन घराकडे पळुन गेले. त्यानंतर मी फिर्यादीला दवाखाण्यात आणले. त्यानंतर पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिला होता.”

११. त्यांनी त्यांच्या उलटतपासात कथन केले की, ”मौजा महाळुंगी येथील शेत स.नं. २८/२ब ही शेतजमीन या शेतीमध्ये माझा हिस्सा राहिला नाही. त्या शेतीविषयी मनाई हुकुमाचा दावा प्रकाश गावंडे यांनी दाखल केला असुन तो सदर न्यायालयात प्रलंबित आहे. प्रकाश तुकाराम गावंडे यांनी आमचे विरोधात उस कापण्याकरीता अडथळा निर्माण करीत आहे याबददलचा दिवानी दावा न्यायालयात दाखल केला होता. प्रकाश गावंडे यांनी त्या शेतीमध्ये उस पिक कापण्याकरीता मनाई हुकुमाचा दावा दाखल केला आहे. प्रकाश गावंडे हा मक्तेदार असल्यामुळे त्या दाव्यामधील तात्पुरत्या मनाई हुकुमाचा अर्ज न्यायालयाने नामंजुर केला आहे. त्यामुळे मला असे वाटे की, निकाल आपल्या बाजुने लागला म्हणुन मी त्या शेतामध्ये रोजच जावुन बसु लागलो. मी पोलीसांना बयान देतेवेळी " मी

बाजुचे शेतामध्ये ढोरं चालत होतो" असे सांगीतले होते. सदर बाब पोलीसांनी माझे बयानात का लिहीली नाही याचे कारण मी सांगु शकत नाही. सदर घटनेचे पुर्वीपासुनच माझा व आरोपींचा शेतीबाबत जुना वाद आहे. शरद याने दि.११/३/२०१९ रोजी आम्ही उस कापु देत नाही म्हणुन आमचे विरुध्द पोलीस स्टेशनला तक्रार दिली होती. ”

**१२.** अभियोग पक्षातर्फे साक्षीदार म्हणून सोनु प्रविण जाधव (अ.सा.क्र.४) यांना नि.क्र. ५० कडे तपासण्यात आले. त्यांनी शपथेवर कथन केले की, "घटना दि ९/४/२०१९ रोजी सकाळी ९.३० वाजताचे दरम्यान माझ्या आईचे शेतात घडली होती. शेतामध्ये मी व माझी बहिण नम्रता मुंगाच्या शेंगा तोडायला गेलो होतो. माझ्या आजोबांचे शेतात उसाचे पिक होते व तो पेटत होता. फिर्यादीकडे मोबाईल असल्यामुळे ती मोबाईलवर जळत असलेल्या उसाचे फोटो काढत असताना आरोपी शरद, स्वप्नील व अश्वीनी मोटरसायकलवर आले व फिर्यादीचा मोबाईल हिसकला व तिला मोठा दगड डोक्याचे डाव्या बाजुला मारले. त्यामुळे ती एका बाजुला पडली. मी तिला उचलायला गेली. तेव्हा ती बेशुध्द होती. आरडाओरड झाली, माझी आई आली. तेव्हा आरोपी स्वप्नीलने काही लोकांना फोन केला. त्यानंतर आरोपी स्वप्नील, शरद, अश्वीनी, रुपाली व नंदकुमार आले व माझी आई, बहिण व मला काठ्यांनी मारहाण केली. त्या शिवारात त्यावेळी कोणीही नव्हते.माझे वडील जनावरे चारत होते, माझे वडील आले तेव्हा त्यांनी त्यांचे सुध्दा दात पाडले. त्यानंतर ते लोकं स्वतः पोलीस स्टेशनला आले.माझी बहिण तिथेच बेशुध्द पडुन राहिली. तिला आम्ही दवाखाण्यात आणले. ते आम्हाला जिवे मारण्याची सारखी धमकी देत असतात. ज्या काठीने व दगडाने आम्हाला मारहाण केली होती ते पाहिल्यास मी ओळखु शकते.”

**१३.** त्यांनी त्यांच्या उलटतपासात कथन केले की, ”माझे १० वी पर्यंत शिक्षण झाले. मला लिहीता वाचता येते. माझ्या वडीलांचे व मामांचे एकच गाव आहे. तुकाराम गावंडे माझे आजोबा आहेत. त्यांना दोन पत्न्या होत्या. पहिल्या पत्नीचे रघुनाथ गावंडे व माझे वडील मुले असुन सख्खे भाऊ आहे. दुसऱ्या पत्नीचे मुले सुधाकर गावंडे व प्रकाश गावंडे आहे. सुधाकर गावंडे अमरावती येथे पोलीस विभागात कार्यरत आहे. मी पोलीसांना बयाण देतेवेळी "मी दिनांक ०९/०४/२०१९ रोजी ९.३० चे दरम्यान माझे आईचे शेतात मी व माझी बहीण नम्रता मुंगाच्या शेंगा तोडायला गेलो होतो" असे बयाण देतांना सांगितले होते, परंतु सदर बाब माझे बयाणात का नमुद नाही याचे कारण सांगु शकत नाही. मी पोलीसांना "माझे वडीलांकडे ५ एकर शेती असुन त्याचा शेत सर्वे नं. २८/२ आहे" असे बयाण देतेवेळी पोलीसांना सांगितले होते, ते बरोबर आहे. शरद गावंडे यांनी शेतीमध्ये ऊस कापल्यामुळे आमचेविरुध्द तक्रार दिली. त्यांनी तक्रार दिली म्हणुन आम्ही तक्रार दिली. कथीत घटनेपुर्वीपासुन आमचे व आरोपीचे वाद असुन आमचे पटत नाही व आमची बोलचाल बंद आहे ”

**१४.** अभियोग पक्षातर्फे पंच साक्षीदार म्हणून कृष्णा अशोकराव लाखकर (अ.सा.क्र.५) यांना नि.क्र.७६ कडे तर अतूल साहेबराव गावंडे (अ.सा.क्र.६) यांना नि.क्र.८० कडे तपासण्यात आले. त्यांनी अभियोगपक्षाला पुरक साक्ष दिली नाही.

**१५.** अभियोग पक्षातर्फे तपास अधिकारी म्हणून सुरेश शिंदे (अ.सा.क्र.७) यांना नि.क्र. ८४ कडे तपासण्यात आले. त्यांनी शपथेवर कथन केले की, "दिनांक ०९/०४/२०१९ रोजी मी आर्णी पोलीस स्टेशन अंतर्गत महाळुंगी बिटमध्ये कार्यरत असतांना त्यादिवशी गु.र.नं. २१८/२०१९ भा.दं.वि. कलम ३२४, ४३५, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल झाला.तपासकामी फिर्याद, प्रथम खबरी अहवाल मिळाले. कागदपत्राचे अवलोकन केले. घटनास्थळ हे महाळुंगी शेतशिवारात लोणी पांदन रस्त्यावर होते.दोन पंचांसह घटनास्थळावर जावुन फिर्यादीने दाखवलेल्या ठिकाणाचा निशाणी ८५ कडील घटनास्थळ पंचनामा केला. आरोपींना अटक केली. आरोपींकडुन काठी आणि दगड जप्त करुन निशाणी ८६ व ८७ कडील जप्तीचे दोन पंचनामे केले. तपासात निष्पन्न झाले की, आरोपींनी काठीने व दगडाने फिर्यादीला मारहाण, शिवीगाळ करून फिर्यादीचे शेतातील ऊस जाळला."

**१६.** त्यांनी त्यांच्या उलटतपासात कथन केले की, "आर्णी ते महाळुंगी हे अंतर सात ते नऊ किलोमीटर आहे. आर्णी येथून महाळुंगी येथे वाहनाने जाण्यास अंदाजे पंधरा ते वीस मिनिटे वेळ लागतो. १२ तारखेला मला गुन्ह्याची केस डायरी मिळाली. केस डायरी मला मिळण्यापूर्वीच मी फिर्यादीचे बयान नोंदवले किंवा कसे ते आता मला आठवत नाही. शेत मिळकतीच्या ताब्याबाबत वाद उपस्थित झाल्यास त्याबाबतचा अहवाल आम्ही तलाठी कडून मागवत असतो. प्रस्तुत प्रकरणात तलाठीचा अहवाल मी मागवला नाही. दोषारोपपत्रासोबत दाखल केलेला सातबारा हा फिर्यादी किंवा फिर्यादीच्या वडिलांच्या नावे नव्हता किंवा कसे ते मला माहित नाही. फिर्यादीने दाखवलेल्या शेतातील ऊस त्याचा असल्याचे त्यांनी कथन केल्याने त्या ठिकाणचा पंचनामा मी केला. त्या शेतातील ऊसाचा पेरा कोणी केला आहे याबाबतचा अहवाल तलाठी कडून मागवण्याची मला आवश्यकता वाटली नाही. साक्षीदारांचे बयान संगणकीकृत आहेत. संगणक मी महाळुंगी येथे घेऊन गेलो नव्हतो. फिर्यादी व आरोपी यांच्यात असलेल्या वादामुळे कोर्टात दाखल असलेल्या प्रकरणांच्या प्रती फिर्यादीने माझ्याकडे सादर केले नाही. फिर्यादीच्या मालकीचा ऊस असल्याबाबतची कागदपत्रे दोषारोपपत्रासोबत मी जोडले नाही. घटनास्थळ हे सार्वजनिक जागेवर नव्हते. "

**१७.** अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. आर.पी.गावंडे यांनी युक्तीवाद केला की, अभियोग पक्षातर्फे एकूण ७ साक्षीदार तपासण्यात आले. प्रस्तुत गुन्हयातील घटनास्थळ व जप्ती पंच फितुर झाले असले तरी इतर साक्षीदारांनी त्यांच्या पुराव्यात घटनेबाबत कथन केलेले आहे. फिर्यादी, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तसेच तपास अधिकारी यांच्या साक्षीतुन आरोपींविरूध्दचा दोषारोप

सिध्द झाला आहे. त्यामुळे आरोपींना दोषी धरून त्यांना जास्तीत जास्त शिक्षा देण्यात यावी.

१८. आरोपींतर्फे विधिज्ञ श्री. एस. के. राठोड यांनी युक्तीवाद केला की, फिर्यादी व साक्षीदारामार्फत आरोपींची ओळखपरेड झाली नाही. त्यामुळे त्यांनी दिलेल्या साक्षीवर विश्वास ठेवता येणार नाही. प्रस्तुत गुन्हयातील घटनास्थळ व जप्ती पंच फितुर झालेले आहेत. फिर्यादी व साक्षीदार तसेच आरोपी यांच्यात पुर्वीपासून वैमनस्य असल्याचे तसेच त्यांच्यात दिवाणी वाद असल्याचे दिसून येत असून त्यांनी विशिष्ट हेतूने आरोपींविरुध्द साक्ष दिल्याचा संशय निर्माण होतो. त्यामुळे आरोपींवरील दोषारोप संशयापलीकडे जावून सिध्द झालेला नाही. आरोपींविरुध्द कोणताही भक्कम व विश्वसनीय पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात यावे.

१९. अभिलेखावरील पुरावे तसेच दोन्ही बाजुंचा युक्तीवाद विचारात घेतला. प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षाने आरोपींविरुद्ध भा.दं.वि. कलम ३२४, ४३५, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये गुन्हा सिद्ध करण्यासाठी फिर्यादी, तिचे नातेवाईक साक्षीदार तसेच तपास अधिकारी यांची साक्ष सादर केलेली आहे. फिर्यादी नम्रता जवके (अ.सा.क्र.१), पुष्पा गावंडे (अ.सा.क्र.२), सुभाष गावंडे (अ.सा.क्र.३) व सोनु जाधव (अ.सा.क्र.४) हे सर्व परस्परांचे नातेवाईक असून त्यांच्यात व आरोपींमध्ये शेतीविषयक जुना वाद तसेच दिवाणी व फौजदारी प्रकरणे प्रलंबित असल्याचे त्यांच्या उलटतपासातून स्पष्टपणे समोर आले आहे. त्यामुळे त्यांची साक्ष ही स्वार्थयुक्त व हितसंबंधित स्वरूपाची असून अशा साक्षीचे अत्यंत सावधगिरीने मूल्यमापन करणे आवश्यक ठरते.

२०. अ.सा.क्र.१ नम्रता जवके यांनी मुख्य परीक्षणात आरोपींनी मोटारसायकलवर येऊन मारहाण केल्याचे सांगितले असले तरी उलटतपासात त्यांनी मोटारसायकलचा क्रमांक पोलीसांना सांगितला नव्हता असे कबूल केले आहे. तसेच आरोपींनी तिच्या आईला काठीने मारहाण केली व वडिलांना बुक्क्याने मारले ही बाब पोलीस बयानात नमूद नसल्याचेही तिने मान्य केले आहे. त्यामुळे तिच्या साक्षीत लक्षणीय सुधारणा व विसंगती दिसून येतात.

२१. अ.सा.क्र.२ पुष्पा गावंडे यांनी मुख्य परीक्षणात आरोपी अश्विन व शरद यांनी नम्रताला काठीने मारले असे कथन केले, तर अ.सा.क्र.१ ने आरोपी स्वप्नीलने काठीने मारल्याचे सांगितले आहे. तसेच अ.सा.क्र.२ यांनी आरोपींनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचे सांगितले, परंतु अ.सा.क्र.१ ने काठीने मारहाण झाल्याचे सांगितले आहे. या परस्परविरोधी कथनांमुळे अभियोगपक्षाच्या साक्षीदारांच्या कथनावर शंका निर्माण होते.

२२. अ.सा.क्र.३ सुभाष गावंडे यांनी घटना दि.९/४/२०२० रोजी घडल्याचे सांगितले असून फिर्यादी व इतर साक्षीदारांनी घटना दि.९/४/२०१९ रोजी झाल्याचे सांगितले आहे. घटनेच्या

वर्षाबाबतच असा मूलभूत विरोधाभास आढळून येतो. तसेच त्यांनी "मी बाजूच्या शेतात ढोरं चारत होतो" ही बाब पोलीसांना सांगितली होती पण ती बयानात नमूद नसल्याचे सांगितले आहे. त्यामुळे त्यांच्या साक्षीची विश्वासार्हता कमी होते. अ.सा.क्र.४ सोनु जाधव हिने सरतपासात परीक्षणात आरोपींनी मोबाईल हिसकावून मोठा दगड मारल्याचे सांगितले, तर फिर्यादीने मोबाईल हिसकावल्याबाबत काहीही सांगितले नाही. तसेच तिने नंदकुमार व रुपाली हे घटनास्थळी आले असल्याचे सांगितले, परंतु इतर साक्षीदारांनी त्यांचा उल्लेख केलेला नाही. त्यामुळे तिची साक्षही विसंगत व अतिशयोक्तिपूर्ण वाटते.

२३. प्रस्तुत प्रकरणातील दोन्ही पंच साक्षीदार अ.सा.क्र.५ व अ.सा.क्र.६ यांनी अभियोग पक्षाला समर्थन दिले नाही. त्यामुळे घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा स्वतंत्र व निष्पक्ष पुराव्याने सिद्ध झालेले नाहीत. तपास अधिकारी अ.सा.क्र.७ यांनी उलटतपासात कबूल केले की, संबंधित शेतजमिनीच्या ताब्याबाबत तलाठ्याचा अहवाल मागवला नव्हता. दोषारोपपत्रासोबत दाखल सातबारा फिर्यादी किंवा तिच्या वडिलांच्या नावावर नसल्याचेही त्यांनी मान्य केले आहे. फिर्यादीच्या मालकीचा ऊस असल्याबाबत कोणतीही कागदपत्रे त्यांनी जप्त किंवा सादर केलेली नाहीत. त्यामुळे आरोपींनी फिर्यादीचा ऊस जाळला हा अभियोग पक्षाचा महत्त्वाचा आरोप विश्वसनीय दस्तऐवजी पुराव्याने सिद्ध होत नाही.

२४. अभियोग पक्षाने आरोपींनी जप्त केलेल्या काठी व दगडाचा वापर करून मारहाण केल्याचे सांगितले असले तरी त्या जप्तीला समर्थन देणारा स्वतंत्र पंचपुरावा उपलब्ध नाही. तसेच कथित शस्त्रांवर रक्ताचे डाग, फॉरेन्सिक अहवाल किंवा इतर वैज्ञानिक पुरावेही अभिलेखावर आलेले नाहीत. तसेच सदरचे हत्यार न्यायालयात कोणत्याही साक्षीदारामार्फत अभियोगपक्षाने पडताळणी केली नाही. प्रस्तुत प्रकरणात सर्व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार हे परस्पर नातेवाईक असून स्वतंत्र व निष्पक्ष साक्षीदार तपासण्यात आलेले नाहीत. घटनास्थळ सार्वजनिक जागेवर नसल्याचे तपास अधिकाऱ्याने मान्य केले असले तरी परिसरातील कोणताही स्वतंत्र साक्षीदार तपासण्यात आलेला नाही. त्यामुळे अभियोग पक्षाचा पुरावा केवळ हितसंबंधित साक्षीपुरताच मर्यादित राहतो.

२५. फिर्यादी पक्ष व आरोपी यांच्यात पूर्वीपासून तीव्र शेतीविषयक वाद, परस्पर तक्रारी व न्यायालयीन प्रकरणे सुरू असल्याचे अभिलेखावरून दिसून येते. अशा परिस्थितीत आरोपींना गोवण्याची शक्यता पूर्णपणे नाकारता येत नाही. फौजदारी न्यायशास्त्राचा मूलभूत सिद्धांत असा आहे की, अभियोग पक्षाने आरोपींचा दोष संशयापलीकडे सिद्ध करणे आवश्यक असते. प्रस्तुत प्रकरणात साक्षीदारांच्या साक्षीतील विसंगती, सुधारणा, स्वतंत्र पुराव्याचा अभाव, पंच साक्षीदार फितूर होणे, तपासातील त्रुटी व पक्षकारांतील जुने वैमनस्य या सर्व बाबी विचारात घेता अभियोग पक्ष आरोपींवरील दोषारोप संशयापलीकडे सिद्ध करण्यात अपयशी ठरतो. त्यामुळे आरोपींना संशयाचा फायदा देणे

आवश्यक ठरते व ते निर्दोष मुक्ततेस पात्र आहेत.

**२६.** त्याचप्रमाणे सदर प्रकरणात फिर्यादी व साक्षीदारामार्फत आरोपींची व हत्यारांची ओळखपरेड झाली नाही. त्यामुळे त्यांनी दिलेल्या साक्षीवर विश्वास ठेवता येणार नाही. अभियोगपक्षातर्फे स्वतंत्र साक्षीदार तसेच वैद्यकीय अधिकारी यांना तपासण्यात आले नाही. तसेच आरोपींनी कोणत्या शब्दात धमकी दिली व शिवीगाळ केली ते शब्द अभिलेखावर आले नाहीत. घटनास्थळ व जप्ती पंचनामा तसेच वैद्यकिय प्रमाणपत्र नियमाप्रमाणे सिध्द झालेले नाही. त्यामुळे आरोपींनी गुन्हा केल्याचे संशयापलिकडे सिध्द होत नाही. आरोपींविरुध्द कोणताही भक्कम व विश्वसनीय पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे वादप्रश्न क्र.१ ते ४ चे उत्तर मी नकारार्थी नोंदवित आहे.

**वादप्रश्न क्र.५ करिता:–**

**२७.** आरोपींविरुध्द कोणताही भक्कम व विश्वसनीय पुरावा अभिलेखावर न आल्याने अभियोगपक्ष आरोपींविरूध्दचा दोषारोप सिध्द करू शकला नाही. त्यामुळे आरोपी हे निश्चितपणे निर्दोष सुटका होण्यास पात्र होत आहे. म्हणून वादप्रश्न ५ चे उत्तर नोंदवितांना मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे –

## आ दे श

| | |
|---|---|
| **१.** | आरोपी क्र. १. स्वप्नील प्रकाश गावंडे, २. अश्वीनी शरद गावंडे, ३. शरद प्रकाश गावंडे व ४. पुष्पा प्रकाश गावंडे यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधान कलम ४३५, ३२४, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये शिक्षापात्र अपराधातून निर्दोष मुक्त करण्यात येते. |
| **२.** | आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) अन्वये दिलेला जामीन आज रोजी पासून पुढील ६ महिन्यांच्या कालावधीकरिता अस्तीत्वात राहील. |
| **३.** | गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल गोटा व काठी मूल्यहीन असल्यामुळे अपिल कालावधी संपल्यानंतर त्यांचा नियमाप्रमाणे नाश करण्यात यावा. |

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित)**

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by DHONDAGE VISHAL SHRAVAN
Date: 2026.05.20 19:36:31 +0530

दिनांकः २०/०५/२०२६ (**विशाल श्रावण धोंडगे**)

स्थळः आर्णी न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग

निकाल सांगितल्याचा दिनांक : २०/०५/२०२६

निकाल टंकलिखीत केल्याचा दिनांक : २०/०५/२०२६

निकालावर सही केल्याचा दिनांक : २०/०५/२०२६